## नियमित दिवाणी दावा क्र.५८/२०१४ मधील
## निशाणी १०९ व ११६ वरील संयुक्त आदेश

१. वादी यांनी निशाणी १०६ वरील अर्ज प्रतिवादी क्र.६ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला ८ वर्षे १ महिन्याचा विलंब माफ होवून मिळण्यासाठी दाखल केला असून त्यांनी निशाणी ११६ वरील अर्ज तो विलंब क्षमापित करणेत येवून प्रतिवादी क्र.६ विरूध्दचा अबेटमेंटचा आदेश रद्द करणेत यावा, यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ यांनी या अर्जांना अनुक्रमे निशाणी ११३ व ११८ वर म्हणणे दाखल करून हरकत घेतली आहे.

३. वादी यांच्या अर्जातील कथनांप्रमाणे त्यांनी दावा मिळकतींचे सरस–निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी व दाव्याचे परिच्छेद क्र.५ मध्ये नमूद खरेदीखतांचे व्यवहार त्यांचे हक्कावर बंधनकारक नाहीत, असे घोषीत होवून मिळणेसाठी हा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.६ सुवर्णा भ्र. अशोक उबाळे ही दिनांक ०९.१०.२०१५ रोजी चिंचोटी, ता.वडवणी, जि.बीड येथे मयत झाली आहे. प्रतिवादी क्र.६ हिला अर्जात नमूद केलेप्रमाणे मनिषा पि. अशोक उबाळे व ऋतुजा पि. अशोक उबाळे ह्या कायदेशीर वारस आहेत. प्रतिवादी क्र.६ हिचे पती व्यसनी असल्याने ते नेहमी तिच्याशी भांडण करून तिला त्रास देत होते. त्यातूनच प्रतिवादी क्र.६ हिने आत्महत्या करून स्वतःचे जीवन संपवले आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र.६ हिचे पतीला कळवून देखील त्याने मनिषा हिचे आधार कार्डची व जन्म प्रमाणपत्राची प्रत वादी यांना दिली नाही. प्रतिवादी क्र.६ हिची दुसरी मुलगी ऋतुजा वादी यांचेकडेच राहत असून तिचे पालनपोषण तेच करतात. परंतु, वादी हे अशिक्षीत व खेडूत असल्याने, वादी क्र.१ हा पुणे येथे मजुरी करत असल्याने, वादी क्र.२ हा ड्रायव्हर असल्याने आणि वादी क्र.४ हिला प्रतिवादी क्र.६ हिच्या मुलीचे अज्ञान पालकत्व स्वीकारता येत असल्याची बाब माहित नसल्याने त्यांचेकडून प्रतिवादी क्र.६ यांचे वारस अभिलेखावर घेणेस ८ वर्षे १ महिन्याचा विलंब झाला आहे. त्या

कालवधीपैकी २ वर्षांचे कालावधीमध्ये कोरोना महामारीमुळे न्यायालयीन कामकाज सुरळीत सुरू नव्हते. प्रतिवादी क्र.६ हिचे वारस या कामी अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी क्र.६ हिचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला ८ वर्षे १ महिन्याचा विलंब माफ करणेत यावा व प्रतिवादी क्र.६ हिचेबाबत झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणेत यावा, अशी विनंती वादी यांनी केली आहे.

४. प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ यांचे म्हणण्यांतील कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.६ ही मयत झाल्याची व तिचे वारसांची वादी यांना पूर्ण कल्पना होती. असे असताना देखील वादी यांनी मुद्दामहून दाव्याचे कामी दखल घेतलेली नाही. वादी यांनी अर्जामध्ये कोणतेही संयुक्तिक कारण नमूद केलेले नाही. त्यामुळे, अर्ज नामंजूर करणेत यावेत, अशी विनंती या प्रतिवादींनी केली आहे.

५. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. वादींतर्फे विधीज्ञ टी.ए.शेख व प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री.एस.ए.लंगे यांचा युक्तिवाद ऐकला.

६. अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांनी दावा मिळकतींचे सरस–निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी व दाव्याचे परिच्छेद क्र.५ मध्ये नमूद खरेदीखतांचे व्यवहार त्यांचे हक्कावर बंधनकारक नाहीत, असे घोषीत होवून मिळणेसाठी हा दावा दाखल केला आहे, असे दिसून येते. प्रतिवादी क्र.६ ही वादी क्र.४ यांची मुलगी आणि वादी क्र.१ ते ३ यांची बहीण असल्याचे दिसून येते. दावा हा मुख्यत्वे करून वाटपासाठी असल्याने प्रतिवादी क्र.६ ही दाव्यास आवश्यक पक्षकार होती, असे स्पष्ट दिसून येते. निशाणी ४१ वरील मृत्यू प्रमाणपत्र पाहिले असता प्रतिवादी क्र.६ ही दिनांक ०९.१०.२०१५ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.६ हिला मनिषा पि. अशोक उबाळे व ऋतुजा पि. अशोक उबाळे या मुली या नात्याने कायदेशीर वारस आहेत. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये या दोन मुली प्रतिवादी क्र.६ हिच्या वारस असल्याबाबत हरकत घेतलेली नाही. दावा हा प्रतिवादी क्र.६ हिचे वडिलांकडील मिळकतींबाबत असल्याने हिंदू वारसा कायदा, १९५६ चे कलम १५ अन्वये प्रतिवादी क्र.६ हिच्या

वर नमूद मुली याच फक्त वारस होतात. प्रतिवादी क्र.६ हिचे पती या दाव्याकरीता तिचे वारस होवू शकत नाहीत.

७. वादी यांचे कथनांनुसार प्रतिवादी क्र.६ हिचे पती हे व्यसनी असून ते तिच्याशी नेहमी भांडण करून तिला त्रास देत असल्याने तिने आत्महत्त्या केली आहे. वादी यांचे कथनांप्रमाणे त्यांनी प्रतिवादी क्र.६ हिची थोरली मुलगी मनिषा हिचे आधार कार्डची व जन्म प्रमाणपत्राची प्रत अशोक उबाळे यांचेकडे मागून देखील त्यांनी ती कागदपत्रे दिली नाहीत. वादी हे अशिक्षीत व खेडूत असल्याने, वादी क्र.१ हा पुणे येथे मजुरी करत असल्याने, वादी क्र.२ हा ड्रायव्हर असल्याने व वादी क्र.४ हिला प्रतिवादी क्र.६ हिच्या मुलींचे अज्ञान पालकत्व स्वीकारता येत असल्याची बाब माहित नसल्याने त्यांचेकडून प्रतिवादी क्र.६ हिचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झाला आहे. वादी क्र.४ यांनी अर्जाचे पुष्टयर्थ शपथपत्र सादर करून अर्जातील ही कथने शपथेवर कथन केली आहेत. त्यामुळे, वादी यांनी त्यांचे अर्जामध्ये नमूद केलेली कारणे संयुक्तिक वाटतात.

८. वादी यांनी या कामी **Banwari Lal (dead) by L.Rs. and Anr. Vs. Balbir Singh**, 2016(6) **Mh.L.J.** 1 या न्यायतत्वाचा आधार घेतला आहे. या न्यायनिर्णयामध्ये मा.ना.सर्वोच्च न्यायालय यांनी अधोरेखित केले आहे की, ''Provisions of Order 22 are not penal in nature. It is a rule of procedure and substantial rights of parties cannot be defeated by pedantic approach by observing strict adherence to procedural aspects of law.''

९. वर नमूद केलेप्रमाणे वादी यांनी हा दावा मुख्यत्वेकरून वाटपासाठी दाखल केला असल्याने प्रतिवादी क्र.६ ही दाव्यास आवश्यक पक्षकार होती. त्यामुळे, प्रतिवादी क्र.६ हिचे पश्चात तिचे वारस देखील या कामी आवश्यक पक्षकार आहेत. प्रतिवादी क्र.६ हिचे मृत्यू पश्चात तिच्या वारसांविरूध्द दाव्याचे कारण पुढे सुरू राहते. वादी यांनी अर्जात नमूद केलेली विलंबाची कारणे संयुक्तिक वाटतात. दावा अद्यापही

प्राथमिक स्तरावर असून दाव्याची चौकशी अद्याप पूर्ण झालेली नाही. त्यामुळे, दाव्याचे स्वरूप पाहता प्रतिवादी क्र.६ हिचे वारस अभिलेखावर घेण्यास वादी यांना परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व जरूरीचे आहे. वादी यांचेकडून प्रतिवादी क्र.६ हिचे वारस अभिलेखावर घेणेसाठी ८ वर्षे १ महिन्याचा विलंब झाला असला तरी तो विलंब वादी यांना कॉस्ट करून माफ करता येवू शकतो. वर नमूद न्यायतत्वाचा विचार करता निव्वळ विलंबाचे कारणास्तव वादी यांना प्रतिवादी क्र.६ यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी परवानगी नाकारणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व उचित होणार नाही. त्यामुळे, वादी यांचेकडून प्रतिवादी क्र.६ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला ८ वर्षे १ महिन्याचा विलंब माफ करणे व त्यांचे विरूध्द झालेला दावा अबेटमेंटचा आदेश रद्द करणे योग्य व उचित होईल. परंतु, वादी यांचेकडून झालेला विलंब पाहता त्यांना रक्कम रू.१०००/– (रूपये एक हजार मात्र) इतकी कॉस्ट होणे व ती कॉस्ट रक्कम प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ यांना अदा करणे देखील आवश्यक आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे :–

**आ दे श**

**१.** वादी यांचे निशाणी १०९ व ११६ वरील अर्ज त्यांनी प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ यांना रक्कम रू.१०००/– (रूपये एक हजार मात्र) इतकी कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येत आहेत.

**२.** वादी यांचेकडून मयत प्रतिवादी क्र.६ हिचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला ८ वर्षे १ महिन्याचा विलंब माफ करणेत येत आहे.

**३.** वादी यांनी प्रतिवादी क्र.६ हिचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्याने त्यांचे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणेत येत आहे.

–

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR Date: 2025.02.12 11:37:41 +0530

**दिनांक : ०६.०२.२०२५** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाणः वडवणी** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वडवणी,**

**ता. वडवणी, जि.बीड.**

## Certificate

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol D. Mule)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Wadwani

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 06.02.2025 |
| Transcribed on | : | 06.02.2025 |
| Checked and signed on | : | 12.02.2025 |